**नागरी सहकारी पतसंस्थांना लागू करण्यात आलेल्या सुधारीत सामोपचार परतफेड योजनेस मुदतवाढ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: सीसीआर-११०६/प्र.क्र.१/पुनर्बांधणी-१/७-स,**
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- २९ जून,२०२६

**वाचा:-**

१) शासन निर्णय, समक्रमांक दिनांक २७.९.२००७
२) शासन निर्णय, समक्रमांक दिनांक १.९.२००८
३) शासन निर्णय, समक्रमांक दिनांक २४.७.२००९
४) शासन निर्णय, समक्रमांक दिनांक १.८.२०१०
५) शासन निर्णय, समक्रमांक दिनांक ९.१२.२०११
६) शासन निर्णय समक्रमांक दिनांक २१.५.२०१२
७) शासन निर्णय समक्रमांक, दिनांक १९.०७.२०१२
८) शासन निर्णय समक्रमांक दिनांक २५.९.२०१३
९) शासन निर्णय समक्रमांक दिनांक २६.३.२०१५
१०)शासन निर्णय समक्रमांक दिनांक २६.३.२०१५
११) शासन निर्णय समक्रमांक दिनांक ६.६.२०१८
१२)शासन शुध्दीपत्रक समक्रमांक दिनांक १९.१०.२०१८
१३)शासन निर्णय समक्रमांक दिनांक १२.६.२०२०
१४)शासन निर्णय समक्रमांक दिनांक ३.९.२०२१
१५)शासन निर्णय समक्रमांक दिनांक १५.६.२०२२
१६) शासन निर्णय समक्रमांक दिनांक ३१.०७.२०२३
१७) शासन निर्णय समक्रमांक दिनांक ०१.०७.२०२४
१८) शासन निर्णय समक्रमांक दिनांक २१.०५.२०२५
१९)सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. २९.०५.२०२६ रोजीचे पत्र.

**प्रस्तावना :-**

राज्यातील नागरी सहकारी पतसंस्थांना वसुल न झालेल्या थकीत कर्जाची तरतूद करावी लागत असल्याने पतसंस्थांच्या अनुत्पादक मत्तेत (NPA) वाढ होत आहे. त्यामुळे पतसंस्थांना मोठया प्रमाणावर तरतूदी कराव्या लागत आहेत. त्यामुळे पतसंस्थांच्या स्वनिधीवर परिणाम होत आहे. त्यामुळे ठेवीदारांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. त्याचा परिणाम नागरी सहकारी पतसंस्थांच्या ठेवी कमी होण्यामध्ये व काही ठिकाणी मोठया प्रमाणावर ठेवी काढण्यात येत असल्याने काही पतसंस्था अडचणीत आल्या आहेत. पतसंस्थांच्या कर्ज वसुलीमध्ये भरीव कामगिरी दिसून येत नाही. पतसंस्थांचे ताळेबंद स्वच्छ करण्याच्या उद्देशाने सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या शिफारशी लक्षात घेऊन राज्यातील सर्व नागरी सहकारी पतसंस्थासाठी समोपचार परतफेड योजनेस दि. २७/९/२००७ च्या शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात आली होती. या योजनेच्या माध्यमातून

झालेल्या वसुलीच्या अनुषंगाने सामोपचार परतफेड योजनेस संदर्भाधिन शासन निर्णयांन्वये वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली होती.

या योजनेद्वारे पतसंस्थांच्या वसुलीमध्ये होणारी भरीव कामगिरी विचारात घेऊन सदर योजनेमध्ये सुधारणा करून बदलांसह दि. ३१/३/२०२७ पर्यंत मुदतवाढ द्यावी असा प्रस्ताव सहकार आयुक्त यांच्याकडून दि. २९/०५/२०२६ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे प्राप्त झालेला आहे. सहकार आयुक्त यांची सदरहू योजनेला मुदतवाढ देण्याबाबतची शिफारस विचारात घेऊन राज्य शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय** :-

या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट " **अ** " मध्ये नमुद केल्याप्रमाणे नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांसाठी राबविण्यात आलेल्या "सुधारीत सामोपचार परतफेड योजनेस" दि. ३१/३/२०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. ही योजना राबविण्यात यावी म्हणून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम १५७ नुसार व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ मधील नियम क्र. ४९ मधील तरतूदीमधून सूट देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६२९१४५६०६४००२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANJUSHA MANDAR SALVI

Digitally signed by MANJUSHA MANDAR SALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=5F3FD7897FEA9717DD9115F782C19536AFEE03D1736A0283493A8863FADEBB45, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2A02139FD3AC94FCBACD18386C5C6655556F2E876E9782822225D5F1AA558DEC, cn=MANJUSHA MANDAR SALVI
Date: 2026.06.29 14:56:54 +05'30'

**(मंजुषा साळवी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था.
३. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी व सचिव, दि महाराष्ट्र अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटीज फेडरेशन, लि. कोल्हापूर
५. अध्यक्ष, दि महाराष्ट्र अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटीज असोसिएशन लि. मुंबई.
६. संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय, मुंबई.
त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदरहु शासन निर्णयास प्रसिध्दी माध्यमांमार्फत विस्तृत प्रसिध्दी द्यावी.
७. निवड नस्ती.

**प्रत माहितीस्तव:-**

१. मा.मंत्री (सहकार) यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय, मुंबई-३२
२. मा. अ.मु.स. (सहकार) यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय,मुंबई-३२

# परिशिष्ट - अ

**(शासन निर्णय जा.क्र. सीसीआर-११०६/प्र.क्र.०१/७-स, दिनांक २९/०६/२०२६ सोबतचे)**

**नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थासाठीची सामोपचार परतफेड योजना**

१) **नाव : नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थासाठीची सामोपचार परतफेड योजना- २०२६**

२) **योजनेसाठी पात्र कर्जदार —**

अ) **या योजनेची कट ऑफ डेट दि.३१.०३.२०२५ राहील.**

ब) **दि.३१/०३/२०२५** अखेर जी कर्जखाती अनुत्पादक कर्जाच्या संशयित (Doubtful) किंवा त्यावरील वर्गवारीत समाविष्ट केलेली असतील अशा सर्व कर्ज खात्यांना ही योजना लागू होईल.

क) **दि.३१/०३/२०२५** अखेर अनुत्पादक कर्जाच्या 'सबस्टँडर्ड' वर्गवारीत समाविष्ट झालेल्या व नंतर संशयित व बुडित वर्गवारीत गेलेल्या कर्जखात्यांना देखील ही योजना लागू होईल.

**३) योजनेसाठी अपात्र कर्जदार -**

सदर योजना पुढील कर्जांना लागू होणार नाही.

अ) संचालक, व त्यांच्या नातेवाईकांनी घेतलेली कर्जे.

ब)फसवणूक, गैरव्यवहार करुन घेतलेली कर्जे व जाणिवपूर्वक थकविलेली कर्जे.

क) नियामक मंडळाच्या मार्गदर्शक तत्वांचे अथवा आदेशांचे उल्लंघन करून वितरीत केलेली कर्जे.

ड) माजी संचालकांना व त्यांचे नातेवाईक आणि त्यांच्याशी हितसंबंध असणाऱ्या भागीदारी संस्था/कंपन्या/फर्म यांना दिलेल्या कर्जांना अथवा त्यांची जामिनकी असणाऱ्या कर्जांना निबंधकाच्या व नियामक मंडळाच्या पूर्व परवानगीशिवाय सदर सवलत देता येणार नाही.

इ) संचालकांच्या कुटुंबातील व्यक्तिंना दिलेल्या कर्जांसाठी अथवा ते जामीनदार असलेल्या कर्जांना सदर योजना लागू होणार नाही. (येथे 'कुटुंब' (Family)) म्हणजे म.स.का. कलम ७५(२) मधील स्पष्टीकरण १ मध्ये नमूद केलेप्रमाणे पत्नी, पती, वडील, आई, भाऊ, बहीण, मुलगा, मुलगी, जावई किंवा सून )

ई) पगारदारांच्या मालकांशी जर पगारकपातीचा करार झाला असेल तर अशा पगारदारांना दिलेल्या खावटी कर्जांसाठी सदर योजना लागू होणार नाही.

*अपवाद — एखादी पगारदार कर्मचा-यांची कंपनी आस्थापना जर बंद झाली असेल अथवा कर्मचारी कपात योजनेनुसार (Employee Retrechment) जर कर्जदार/ जामीनदार यांची नोकरी संपुष्टात आली असेल तर अशा पगारदारांच्या कर्ज प्रकरणांना सदर योजना लागू राहील. तसेच जर पगारदार कर्मचारी (कर्जदार) मयत झाला असेल, तर अशा पगारदार कर्ज प्रकरणांना देखील सदर योजना लागू राहील.*

उ) मंजूर कर्जाचा विनियोग कर्ज ज्या कारणांकरिता मंजूर केले असेल, त्या कारणाव्यतिरिक्त इतर कारणांकरिता केले असेल तर.(Diversion of funds)

**४) <u>योजनेची मुदत</u>**

या योजनेची मुदत दि. ३१ मार्च २०२७ पर्यंत राहील. दि. २८ फेब्रुवारी २०२७ पर्यंत प्राप्त झालेल्या अर्जांवर दि. ३१ मार्च २०२७ पर्यंत निर्णय घ्यावा लागेल.

**५) <u>योजनेची व्याप्ती</u>**

अ) ही योजना सर्व प्रकारच्या सवलतींना लागू होईल.

ब) कोणत्याही कायद्याअंतर्गत कारवाई चालू असणाऱ्या व कलम १०१ अन्वये वसूली दाखला प्राप्त व कलम ९१ अन्वये निवाडे प्राप्त झालेल्या कर्जांनासुद्धा ही योजना लागू होईल.

क) जेथे कर्जदाराची एकापेक्षा जास्त कर्जखाती असतील व त्यापैकी एखादे / काही कर्जखाती अनुत्पादक झाली म्हणून इतर सर्व कर्जखाती 'समूह कर्जे' म्हणून अनुत्पादक होतात. तर सर्व कर्जखात्यांना एक रकमी कर्ज परतफेड योजेची सवलत देण्यात यावी.

**६) <u>योजनेसाठी तडजोडीचे सूत्र</u>**

सहकार आयुक्त व निबंधक यांनी संकल्पना – जिंदगीचे वर्गीकरण व अनुत्पादक जिंदगीसाठी करावयाच्या तरतुदीसाठी प्रसिध्द केलेल्या कर्जखात्याचे केलेले वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | जिंदगी वर्गीकरण | थकीत कालावधी |
|---|---|---|
| १ | सबस्टॅन्डर्ड जिंदगी ( Sabstandard) | ७ व्या महिन्यापासून ते १८ व्या महिन्यापर्यंत |
| २ | संशयीत-१ (Doubtful-१) | १९ व्या महिन्यापासून ते ४२ व्या महिन्यापर्यंत |
| ३ | संशयीत-२ ( Doubtful-२) | ४३ व्या महिन्यापासून ते ५४ व्या महिन्यापर्यंत |
| ४ | संशयीत-३ ( Doubtful-३) | ५५ व्या महिन्यापासून पुढे |
| ५ | बुडीत (Loss) | वैधानिक लेखापरीक्षक, यांनी प्रमाणित केलेनुसार |

अ) ज्या दिवशी संबंधित कर्जखाते हे अनुत्पादक कर्जाच्या संशयीत-१ (Doubtful-१) या वर्गवारीत वर्गीकृत केले असेल त्या दिवशीचा लेजर बॅलन्स व येणे व्याज अशी एकत्रित रक्कम व मुद्दल रकमेवर पतसंस्थेने सरळव्याज पध्दतीने व्याजाची आकारणी करावी. व्याजाचा दर ठरविताना सदर दर हा ८% प्रमाणे राहील. मात्र पतसंस्थेने ठरविलेला व्याजदर हा सर्वांना समान असले. उपरोक्त व्याजदरानुसार तडजोडीची रक्कम ठरविताना व्याजदर हा सर्वांना समान असेल.उपरोक्त व्याजदरानुसार तडजोडीची रक्कम ठरविताना अर्जदाराच्या खात्यावर खात्यावर (Doubtful-१) च्या तारखेनंतर भरलेल्या रकमेची त्यास सर्वात शेवटी वजावट देणेत यावी. मात्र,कोणत्याही परिस्थितीत Doubtful-१ च्या दिवशी व्याजासहित येणी असलेल्या रकमेपैकी कमी रक्कम घेऊन पतसंस्थेस खातेबंद करता येणार नाही.

ब) <u>संस्थेने द.सा.द.शे. ८% दराने सरळव्याज पध्दतीने तडजोडीच्या दिनांकापर्यंत व्याजाची आकारणी करावी.</u>

क) तडजोड रक्कम परिशिष्ट ब-१ प्रमाणे निश्चित करावी व तडजोड रक्कम उणे (Negative) येत असेल तर अशी रक्कम कर्जदारास परत न करता संबंधीत कर्जखाते या योजनेअंतर्गत बंद करावे.

ड) १) संशयीत-३ (Doubtful-३) किंवा बुडीत कर्जखात्याची येणेबाकी काढताना संशयीत-१ (Doubtful-१) च्या मुददल रकमेवर द.सा.द.शे. ८% व्याजदराने सरळव्याज पध्दतीने डी-३ पर्यंतच्या कालावधीसाठी व्याजाची आकारणी करावी व त्यामध्ये डी-१ तारखेचे व्याज मिळावावे व परिशिष्ट ब-१ अनुसार तडजोड रक्कम निश्चित करावी. सदर कर्जखात्यावर संशयीत-३ (Doubtful-३) किंवा बुडीत (Loss) च्या दिनांकानंतर व्याज वसूल करण्यात येणार नाही.

२) जर तडजोड रक्कम उणे (Negative) येत असेल तर अशी रक्कम कर्जदारास परत न करता संबंधीत कर्जखाते या योजनेअंतर्गत बंद करावे.

इ) १) मयत कर्जदाराच्या बाबतीत तडजोड रक्कम परिशिष्ट ब-२ प्रमाणे निश्चित करावी.

२) जर तडजोड रक्कम उणे (Negative) येत असेल तर अशी रक्कम कर्जदारास परत न करता संबंधीत कर्जखाते या योजनेअंतर्गत बंद करावे.

उपरोक्त सुधारणेमध्ये नमूद करण्यात आलेल्या परिशिष्ट ब-१ मध्ये- संशयीत-३ (Doubtful-३) बुडीत कर्ज खात्यासंदर्भात तडजोडीचे सूत्र व परिशिष्ट ब-२ मध्ये – मयत कर्जदारांच्या खात्यासंदर्भात तडजोडीचे सूत्र नमूद करण्यात आलेले असून सदर दोन्ही परिशिष्टे शासन निर्णयामध्ये समाविष्ट करण्यात येत आहेत.

३) दि.३१/३/२०२२ रोजी किंवा तत्पूर्वी जी कर्जखाती संशयित-३(Doubtful-३) किंवा बुडीत (Loss) या प्रकारात वर्गीकृत केली असतील व सदर कर्जदार मयत असेल तर, मयत थकीत कर्जदारांच्या वारसांकडून वसूली करताना सदरचे खाते संशयीत-१(Doubtful-१) मध्ये वर्ग झाल्याच्या दिनांकारोजीची एकूण येणे (मुददल+व्याज) रक्कम वसूल करावी.

**७) या योजनेअंतर्गत खालील बाबीमध्ये सूट देता येणार नाही.-**

अ) संशयित (**Doubtful**) कर्जाच्या वर्गवारीत,ज्या तारखेस सदर कर्जाचा समावेश झाला असेल त्या तारखेस असलेली येणे रक्कम म्हणजेच लेजर बॅलन्स व त्या दिवसापर्यंतचे येणे व्याज अशी एकूण रक्कम.

ब) जाहिरातीसाठी झालेला खर्च.

**८) <u>पतसंस्थांनी करावयाची कार्यवाही</u>**

अ) सदर योजना स्विकारणे पतसंस्थांवर बंधनकारक नाही. मात्र सदर योजना स्विकारल्यानंतर ती सर्व कर्जदारांमध्ये कोणताही भेदभाव न करता समान पद्धतीने लागू करण्याचे बंधन पतसंस्थांवर राहील.

ब) सदर योजना स्वीकारावयाची अथवा नाही याचा निर्णय पतसंस्थांवर घ्यावयाचा आहे. मात्र योजना स्वीकारल्यानंतर त्या संदर्भातील संचालक मंडळाचा ठराव, योजना जाहीर केल्यानंतर जिल्हा उपनिबंधकांकडे ३० दिवसांत सादर करणे आवश्यक राहील.

क) योजना स्वीकारल्यानंतर त्याची माहिती सर्व शाखांच्या नोटीस बोर्डवर लावणे पतसंस्थांना बंधनकारक आहे. तसेच पतसंस्थेच्या सभासदांनी मागणी केल्यास या योजनेची प्रत देण्याचे बंधन पतसंस्थावर राहील.

ड) योजनेच्या अंमलबजावणीसाठी पतसंस्थेचे अध्यक्ष, दोन/तीन संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी/व्यवस्थापक हे त्या उपसमितीचे सदस्य असतील. सदर समितीने मंजूर केलेल्या प्रकरणांना संचालक मंडळाच्या पुढील सभेमध्ये मान्यता घेणे आवश्यक राहील.

इ) या योजनेअंतर्गत नामंजूर करण्यात येणा-या सर्व कर्जदारांना कारणासह नामंजूरीचे पत्र देणे पतसंस्थावर बंधनकारक राहील.

ई) एन.पी.ए. ची तारीख व वर्गवारी पतसंस्थेच्या दफ्तराप्रमाणे व लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्याप्रमाणे निश्चित करण्यात यावी. कर्ज परतफेडी संबंधी बाबींमधील वाद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९१ अंतर्गत सोडविण्याची तरतूद आहे. त्याप्रमाणे सदर योजनेचा लाभ देणेचे अनुषंगाने अगर तडजोड रकमेबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्याबाबत संबंधित तरतूदीप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

फ) तडजोड रकमेचा भरणा कर्जदारांनी त्याच पतसंस्थेतून नवीन कर्ज घेऊन करावयाचा नाही. पतसंस्थेतील अशा इतर कोणत्याही कर्जातून तडजोड रकमेचा भरणा झाल्यास, त्याकरीता संचालक मंडळास जबाबदार धरुन कारवाई करण्यात येईल.

ग) सदर कर्ज परतफेड योजनेअंतर्गत कर्जखाते बंद करताना संबंधित कर्जदारास नव्याने कर्ज / सवलत देता येणार नाही. कर्जदारास पुढील ५ वर्षांपर्यंत पतसंस्थेकडून कोणत्याही प्रकारचे कर्ज / सवलत घेता येणार नाही तसेच तो पतसंस्थेतील कोणत्याही कर्जास / सवलतीस ५ वर्षे जामीन राहू शकणार नाही.

ह) सदर योजनेअंतर्गत अर्जामध्ये नमूद करण्यासाठी कर्जदाराने आपल्या कर्जखात्याची (लेजर) माहिती मागितल्यास संस्थेने सदरची माहिती कर्जदारास तात्काळ उपलब्ध करुन दयावी.

९) **<u>परतफेड करण्यासाठी कालावधी</u>**

अ) कर्जदाराने नागरी/ग्रामीण बिगरकृषि सहकारी पतसंस्थासाठी एक रकमी कर्ज परतफेड योजनेनुसार करावयाच्या अर्जासोबत, सदर कर्ज प्रकरण ज्या दिवशी अनुत्पादक कर्जाच्या संशयीत-१ (Doubtful-१) या वर्गवारीत वर्गीकृत केले असेल, त्या दिवशीच्या लेजर बॅलन्सच्या (मुददल + व्याज) किमान ५% रक्कम भरणे आवश्यक आहे.

ब) i) नागरी/ग्रामीण बिगरकृषि सहकारी पतसंस्थासाठी एक रकमी परतफेड योजनेअंतर्गत अर्ज मंजूरीचे पत्र प्राप्त झाल्यापासून कर्जदाराने एक महिन्यात तडजोडीची सर्व रक्कम भरणे आवश्यक आहे. अथवा

ii) नागरी/ग्रामीण बिगरकृषि सहकारी पतसंस्थासाठी एकरकमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत अर्ज मंजूरीचे पत्र प्राप्त झाल्यापासून एक महिन्याचे आत कर्जदाराने तडजोड रकमेच्या किमान २५% रक्कम भरल्यास उर्वरित रक्कम भरण्यास पुढील जास्तीत जास्त ११ मासिक हप्त्यांचा कालावधी देता येईल. कर्जदाराने १ महिन्यांत २५% रक्कम न भरल्यास सदर योजनेचा लाभ घेणेस कर्जदाराने नकार दिला आहे असे समजून कर्जदाराने अर्जासोबत भरणा केलेली ५% रक्कम बँकांनी मुददलात जमा करुन घेतली जाईल.

iii) उर्वरित ७५% रकमेचा भरणा पुढील ११ मासिक हप्त्यामध्ये करावयाचा असून, त्यास द.सा.द.शे. ८% सरळव्याज पध्दतीने व्याजाची आकारणी केली जाईल. या कालावधीत

कोणताही हप्ता भरण्यास उशीर झाल्यास त्यावर उशीर झालेल्या मुदतीसाठी व उशीर झालेल्या रकमेवर द.सा.द.शे. २% दंड व्याज आकारण्यात येईल.

क) प्रथम १२ महिन्यांच्या कालावधीत तडजोड रकमेचा संपूर्ण भरणा अर्जदाराने न केल्यास, उर्वरीत रकमेसाठी त्यास जास्तीत जास्त १२ महिन्यांचा जादा कालावधी दिला जाईल व अशा कालावधीसाठी उर्वरीत रकमेवर द.सा.द.शे. १२% व्याजदर आकारला जाईल. या वाढीव कालावधीत कोणताही हप्ता भरण्यास उशीर झाल्यास त्यावर उशीर झालेल्या मुदतीसाठी व उशीर झालेल्या रकमेवर द.सा.द.शे. २% दंड व्याज आकारण्यात येईल.

ड) वरीलप्रमाणे जास्तीत जास्त २४ महिन्यात तडजोड रकमेचा भरणा अर्जदाराने न केल्यास, अर्जदारास दिलेली सवलत रद्द करुन त्यांनी यापूर्वी भरणा केलेली सर्व रक्कम प्रथम थकित व्याजापोटी व नंतर मुद्दलापोटी वसूल करुन नियमित व्याजासह व इतर सर्व खर्चासह सर्व येणे रक्कम वसूल करण्याचा अधिकार पतसंस्थेस राहील.

**१०) <u>योजनेसंबंधी इतर तरतुदी</u>**

अ) या योजनेत बदल करण्याचा अधिकार पतसंस्थांना असणार नाही.

ब) सदर योजना स्वीकारल्यानंतर ती सर्व कर्जदारांना कोणताही भेदभाव न करता समान पद्धतीने लागू करण्याचे बंधन पतसंस्थांवर राहील.

क) एक रकमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत सवलत मिळणाऱ्या कर्जखात्यांना महाराष्ट्र सहकार नियम १९६१ चे नियम ४९ अंतर्गत नमूद केलेली निर्लेखनाची प्रक्रिया लागू होणार नाही.

ड) या योजनेअतर्गत तडजोड केलेल्या खात्यांची सर्व माहिती वार्षिक साधारण सभेने नोंद घेण्यासाठी पुढील वार्षिक सभेस, स्वतंत्र विषयाद्वारे देण्याचे बंधन पतसंस्थांवर राहील.

इ) या योजनेअतर्गत होणाऱ्या वसुलीवर Cost-process- आदेशिकेचा खर्च लागणार नाही.

फ) जामीनदार हे सहकर्जदार असल्याने या योजनेअंतर्गत कर्जदाराने अर्ज केला नाही तर तो जामीनदारांनाही अर्ज करता येईल.

ग) सदर योजना ही राज्यातील नागरी/ग्रामीण बिगरकृषि सहकारी पतसंस्थांना लागू राहील.

ह) या योजनेबाबत परिशिष्ट ब (तडजोडीचे सुत्र), परिशिष्ट क (अर्जदाराने करावयाचा अर्जाचा नमुना), परिशिष्ट ड (मंजूरी पत्राचा नमुना), परिशिष्ट इ (वार्षिक सर्वसाधारण सभेसमोर द्यावयाची माहिती), परिशिष्ट ब१ (बुडीत कर्जखात्यासंदर्भात तडजोडीचे सुत्र), परिशिष्ट ब२ (मयत कर्जदाराच्या कर्जखात्यासंदर्भात तडजोडीचे सुत्र) जोडली आहेत.

**११) योजनेची प्रसिध्दी व प्रचार :-**

या योजनेचा अधिकाधिक कर्जदारांना व पतसंस्थांना फायदा घेता यावा व पतसंस्थेकडील एन.पी.ए. कमी होण्यास मदत व्हावी या दृष्टीने आवश्यक ती प्रसिध्दी नागरी/ग्रामीण बिगरकृषि सहकारी पतसंस्थांच्या राज्य/विभाग/जिल्हा/तालुका फेडरेशन यांनी करावी.

**१२) योजनेचे संनियंत्रण व अहवाल सादर करणे.**

सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्याचे दृष्टीने सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वेळोवेळी आढावा घेऊन या योजनेचे संनियंत्रण करावे व योजनेच्या प्रगती व फलनिष्पत्तीबाबत संबंधीत संस्था व क्षेत्रीय यंत्रणांकडून माहिती घेऊन दर तीन महिन्यांनी शासनास अहवाल सादर करावा.

MANJUSHA MANDAR SALVI

Digitally signed by MANJUSHA MANDAR SALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=5F3FD7897FEA9717DD9115F782C19536AFEE03D1736A0283493A8863FADEBB45, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2A02139FD3AC94FCBACD18386C5C6655556F2E876E9782822225D5F1AA558DEC, cn=MANJUSHA MANDAR SALVI
Date: 2026.06.29 14:57:22 +05'30'

**(मंजुषा साळवी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

## परिशिष्ट ब

**(शासन निर्णय जा.क्र. सीसीआर-११०६/प्र.क्र.०१/७-स, दिनांक २९/०६/२०२६ सोबतचे)**

### 'तडजोडीचे सूत्र'

**उदाहरण :-**

| अ.क्र. | कर्जदाराची कर्जखाती | | अनुत्पादक कर्जे |
|---|---|---|---|
| १. | **मुदत कर्ज** | **रु.५.०० लाख** | **५.०० लाख** |
| २. | **खेळते भांडवल** | **रु.३.०० लाख** | - - |
| ३. | **बील डिस्काऊंटींग** | **रु.१.०० लाख** | - - |
| | **एकूण कर्जे** | **रु.९.०० लाख** | **५.०० लाख** |

| | | | |
|---|---|---|---|
| D-१ चे मुद्दल | - | रु.५.०० लाख | |
| अधिक | | | |
| D-१ चे येणे व्याज | - | रु.१.०० लाख् | |
| **D-१ चे एकूण येणे** | - | रु.६.०० लाख | (अ) |
| अधिक | | | |
| रु.५ लाखावर (म्हणजेच केवळ मुददलावरच )<br>तडजोडीच्या दिनांकापर्यंत ( दि.३१/३/२०२५ गृहीत)<br>**द. सा. द.शे. ८% दराने** सरळ व्याज | - | रु.२.०० लाख | |
| अधिक | | | |
| अ.जाहीरात खर्च | | रु. ०.१० लाख | |
| ब.विमा खर्च | | रु.०.०५लाख | |
| क. न्यायालयीन बाबींसाठी केलेला प्रत्यक्ष खर्च | | रु.०.३५लाख | |
| एकूण (अ+ब+क) | - | रु.०.५० लाख | |
| **एकूण येणे** | - | रु.८.५० लाख | (ब) |
| वजा | | | |
| D-१ नंतर पतसंस्थेत भरणा केलेली रक्कम | - | रु.१.५० लाख | |
| **तडजोड रक्कम** | - | रु.७.०० लाख | (क) |

**टीप** - १) वर कलम (अ) मधील रकमेच्या ५% रक्कम अर्जदाराने अर्ज करतेवेळी भरणा करणे आवश्यक आहे.

MANJUSHA MANDAR SALVI

Digitally signed by MANJUSHA MANDAR SALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=5F3FD7897FEA9717DD9115F782C19536AFEE03D1736A0283493A8863FADEBB45, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2A02139FD3AC94FCBACD18386C5C6655556F2E876E9782822225D5F1AA558DEC, cn=MANJUSHA MANDAR SALVI
Date: 2026.06.29 14:57:39 +05'30'

**(मंजुषा साळवी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**परिशिष्ट क**

**(शासन निर्णय जा.क्र. सीसीआर-११०६/प्र.क्र.०१/७-स, दिनांक २९/०६/२०२६ सोबतचे)**

**अर्जदाराने करावयाच्या अर्जाचा नमुना'**

दि. / /

प्रति,

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी**

- - - - - नागरी/ग्रामीण बिगरकृषि सहकारी पतसंस्थांना मर्या.,

**विषय** - शासन निर्णय दिनांक / / नुसार नागरी/ग्रामीण बिगरकृषि सहकारी पतसंस्थांसाठी 'एकरकमी कर्ज परतफेड योजना-२०२६ 'अंतर्गत सवलत मिळणेबाबत विनंती अर्ज.

**संदर्भ** - माझे थकित कर्जखाते क्र. - - - - - - - शाखा - - - - - - - - -

महोदय/महोदया,

माझे उपरोक्त संदर्भित कर्जखाते क्र. - - - - थकित असून, संस्थेच्या पुस्तकात अनुत्पादक कर्जाच्या 'संशयित-१' (Doubtful-१) या वर्गवारीत वर्गीकृत केली आहेत.

*माझ्या कर्जखात्यांचा तपशील पुढीलप्रमाणे :-*

| *अ.क्र.* | *कर्जखात्याचा प्रकार* | *अनुत्पादक कर्जाचे वर्गीकरण* | *डी-१ ची थकीत रक्कम (मुददल + व्याज)* |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |

सदर कर्जखात्यावरील येणे रक्कम मला शासन निर्णय दिनांक / / नुसार नागरी/ग्रामीण बिगरकृषि सहकारी पतसंस्थांसाठी 'एकरकमी कर्ज परतफेड योजना २०२६' अंतर्गत भरावयाची असून, या योजनेअंतर्गत मी देय असणारी तडजोडीची रक्कम मला त्वरित कळवावी.

मी, ______________________________ शपथपूर्वक सांगतो की, नागरी/ग्रामीण बिगरकृषि सहकारी पतसंस्थांसाठी 'एकरकमी कर्ज परतफेड योजना २०२६' च्या सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून, त्या मला मान्य आहेत व मी त्यांचे पालन करण्याची हमी देतो तसेच मी केलेल्या या अर्जास, माझ्या कर्जास जामीनदार असलेल्या सर्वांची मान्यता आहे.

सदर योजनेचा लाभ घेतल्यानंतर पुढील ५ वर्षापर्यंत संस्थेकडून कोणत्याही प्रकारचे कर्ज / सवलत मला घेता येणार नाही तसेच इतर कोणत्याही कर्जास / सवलतीस पुढील ५ वर्ष मी जामीन राहू शकणार नाही याची मला कल्पना असून त्यास माझी मान्यता आहे.

सदर योजनेतीत अटींनुसार, अर्जासोबत मी माझ्या संबंधित कर्जखात्यांवर D-I रोजी येणे असलेल्या लेजर बॅलन्स + त्या दिवसांपर्यंतचे येणे व्याज अशा रु. इतक्या येणे रकमेच्या ५% म्हणजेच रु. चा डिमांड ड्राफ्ट / पे-ऑर्डर सोबत जोडत आहे / रोख भरणा केलेला आहे.

तरी माझ्या अर्जाचा सहानुभूतिपूर्वक विचार करुन शासन निर्णय क्रमांक - - - दिनांक / / मधील एक रकमी कर्ज परतफेड योजनेची सवलत मला दयावी अशी विनंती आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

सही/-

**(कर्जदाराचे नाव)**

**कर्जखाते क्र. -**

**शाखेचे नाव -**

# परिशिष्ट ड

**(शासन निर्णय जा.क्र. सीसीआर-११०६/प्र.क्र.०१/७-स, दिनांक २९/०६/२०२६ सोबतचे)**

**मंजूरी पत्राचा नमुना**

दि. / /

**प्रति,**

**अर्जदार श्री.**- - - - - - -

**विषय** - शासन निर्णय दिनांक / / नुसार नागरी/ग्रामीण बिगरकृषि सहकारी पतसंस्थांसाठी 'एकरकमी कर्ज परतफेड योजने'अंतर्गत सवलत मिळणेबाबत विनंती अर्ज.

**संदर्भ** - १) आपला दि. / / रोजीचा विनंती अर्ज.

२) आपले थकित कर्जखाते क्र. - - - - - - - - शाखा - - - - - - - - - .

महोदय/महोदया,

आपल्या उपरोक्त संदर्भित अर्जानुसार नागरी/ग्रामीण बिगरकृषि सहकारी पतसंस्थांसाठी एकरकमी कर्ज परतफेड योजना समितीने / संचालक मंडळाने, दि. / / . रोजीच्या सभेतील ठराव क्र. नुसार आपणांस नागरी/ग्रामीण बिगरकृषि सहकारी पतसंस्थांसाठी 'एकरकमी कर्ज परतफेड योजना-२०२६' अंतर्गत रु. /- इतकी 'तडजोड रक्कम' (Settlement Amount) निश्चित केली असून, यापोटी आपण अर्जासोबत भरलेली रक्कम रु. /- बँकेस दि. / / रोजी प्राप्त झाली आहे. उर्वरित रकमेचा भरणा आपण पुढीलप्रमाणे करावयाचा आहे.

| अ.क्र. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| अ) | तडजोड रक्कम तात्काळ भरणा केल्यास | रु. |
| ब) | तडजोड रकमेच्या २५% रक्कम | रु. |

**परतफेडी संबंधी अटी व शर्ती**

i) नागरी/ग्रामीण बिगरकृषि सहकारी पतसंस्थांसाठी एक रकमी परतफेड योजना २०२६ अंतर्गत अर्ज मंजूरीचे पत्र प्राप्त झाल्यापासून कर्जदाराने एक महिन्यात तडजोडीची सर्व रक्कम भरणे आवश्यक आहे.

अथवा

ii) नागरी/ग्रामीण बिगरकृषि सहकारी पतसंस्थांसाठी एकरकमी कर्ज परतफेड योजना २०२६ कर्जदारास मंजूर केल्यानंतर कर्जदाराने तडजोड रकमेच्या किमान २५% रक्कम मंजूरीच्या दिनांकापासून एक महिन्याचे आत भरल्यास उर्वरित रक्कम भरण्यास पुढील जास्तीत जास्त ११ मासिक हप्त्यांचा कालावधी देता येईल. १ महिन्यांत २५% रक्कम न भरल्यास सदर योजनेचा लाभ घेणेस कर्जदाराने नकार दिला आहे असे समजून कर्जदाराने अर्जासोबत भरणा केलेली ५% रक्कम पतसंस्थांनी मुददलात जमा करुन घेतली जाईल.

iii) उर्वरित ७५% रकमेचा भरणा पुढील ११ मासिक हप्त्यामध्ये करावयाचा असून, त्यास **द.सा.द.शे.८%** दराने सरळव्याज पध्दतीने व्याजाची आकारणी केली जाईल. यावेळी कोणताही हप्ता भरण्यास उशीर झाल्यास त्यावर उशीर झालेल्या मुदतीसाठी व उशीर झालेल्या रकमेवर द.सा.द.शे. २% दंड व्याज आकारण्यात येईल.

कळावे

आपला विश्वासू,

सही/-

**(प्राधिकृत अधिकारी)**

**नागरी/ग्रामीण बिगरकृषि सहकारी पतसंस्था मर्या.**

**सोबत** - तडजोड रकमेची गणिते (Calculations)

## परिशिष्ट इ

**((शासन निर्णय जा.क्र. सीसीआर-११०६/प्र.क्र.०१/७-स, दिनांक २९/०६/२०२६ सोबतचे)**

**'वार्षिक सर्वसाधारण सभेसमोर द्यावयाची माहिती'**

**विषय** - महाराष्ट्र शासनाच्या नागरी/ग्रामीण बिगरकृषि सहकारी पतसंस्थासाठी 'एकरकमी कर्ज परतफेड योजना-२०२६ ' शासन निर्णय क्रमांक - - दिनांक / / अंतर्गत तडजोड केलेल्या थकित कर्जखात्यांची माहिती देणे व संचालक मंडळाच्या निर्णयाची नोंद घेणे. (कालावधी दि.१/४/२०- - ते दि.३१/३/२०- - )

---

१) तडजोड झालेल्या एकूण कर्जखात्यांची संख्या -

२) तडजोड झालेल्या खात्यामधील एकूण कर्ज मंजूर रक्कम - रु.

३) तडजोड झालेल्या खात्यावरील दि.३१/३/२०—अखेरीचे एकूण येणे
( मुददल + व्याज) - रु.

४) संबंधित तडजोड खात्यांवर आजपर्यंतचे एकूण येणे व्याज - रु.

५) संबंधित तडजोड खात्यांमध्ये आजपर्यंत वसूल झालेली रक्कम (मुददल+व्याज) रु.

६) संबंधीत तडजोड खात्याची आजपर्यंतची एकूण येणे रक्कम - रु.

७) संबंधीत तडजोड खात्यावर **पतसंस्थेने** दिलेली येणे व्याजातील एकूण सूट - रु.

---

**टीप** - सदर विषय हा केवळ नोंद घेण्याचा असल्याने यासंबंधी सूचक व अनुमोदक घेऊन ठराव मंजूर करण्याची आवश्यकता नाही.

MANJUSHA MANDAR SALVI

Digitally signed by MANJUSHA MANDAR SALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=5F3FD7897FEA9717DD9115F782C19536AFEE03D1736A0283493A8863FADEBB45, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2A02139FD3AC94FCBACD18386C5C6655556F2E876E9782822225D5F1AA558DEC, cn=MANJUSHA MANDAR SALVI
Date: 2026.06.29 14:57:59 +05'30'

**(मंजुषा साळवी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

# परिशिष्ट ब (१)

**( शासन निर्णय_जा.क्र. सीसीआर-११०६/प्र.क्र.०१/७-स,_ दि. २९/०६/२०२६ सोबतचे संशयीत-३ (Doubtful-३) बुडीत कर्ज खात्यासंदर्भात तडजोडीचे सूत्र)**

उदाहरण-

| अ.क्र. | कर्जदाराची खाती | | अनुत्पादक कर्जे |
|---|---|---|---|
| १. | मुदत कर्ज | रु.५.०० लाख | रु.५.००लाख |
| २. | खेळते भांडवल | रु.३.००लाख | --- |
| ३. | बील डिस्काऊंटींग | रु.१.००लाख | --- |
| | एकूण कर्ज | रु.९.००लाख | रु.५.००लाख |

| | |
|---|---|
| D-१ चे मुद्दल | रु ५.००-लाख |
| अधिक | |
| D-१ चे येणे व्याज | रु.१.००लाख |
| D-१ चे एकूण येणे | रु.६.००लाख (अ) |
| अधिक | |
| रु ५.लाखावर (म्हणजेच केवळ मुददलावरच ) | |
| D-१ पासून D-३ पर्यंत दसादशे ८% दराने | |
| सरळव्याज ( अंदाजे ) | रु.२.००लाख |
| D-३ दिनांकाअखेरची येणे बाकी | रु.८.०० लाख |
| अधिक | |
| अ.जाहिरात खर्च | रु.०.१०लाख |
| ब. विमा खर्च | रु.०.०५लाख |
| क. न्यायालयीन बाबीसाठी केलेला प्रत्यक्ष खर्च | रु.०.३५लाख |
| एकूण खर्च रक्कम | रु.०.५०लाख |
| एकूण येणे | रु.८.५०लाख (ब) |
| वजा | |

D-१ चे नंतर तडजोडच्या तारखेपर्यंत कर्जदाराने पतसंस्थेत भरणा केलेली रक्कम रु.३.००लाख

तडजोड रक्कम - रु.५.५०लाख (क)

( टीप-१) वर कलम(अ) मधील रकमेच्या ५% रक्कम अर्जदाराने अर्ज करतेवेळी भरणा करणे आवश्यक आहे )

MANJUSHA MANDAR SALVI

Digitally signed by MANJUSHA MANDAR SALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=5F3FD7897FEA9717DD9115F782C19536AFEE03D1736A0283493A8863FADEBB45, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2A02139FD3AC94FCBACD18386C5C6655556F2E876E9782822225D5F1AA558DEC, cn=MANJUSHA MANDAR SALVI
Date: 2026.06.29 14:58:17 +05'30'

**(मंजुषा साळवी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

## परिशिष्ट- ब (२)

**शासन निर्णय क्र_जा.क्र. सीसीआर-११०६/प्र.क्र.०१/७-स_दि.२९/०६/२०२६**
**सोबतचे मयत कर्जदाराच्या खात्यासंदर्भात तडजोडीचे सूत्र**

उदाहरण :-

| अ.क्र. | कर्जदाराची कर्जखाती | | |
|---|---|---|---|
| | अनुत्पादक कर्जे | | |
| १) | मुदत कर्ज | रु.५.००लाख | रु.५.००लाख |
| २) | खेळते भांडवल | रु.३.००लाख | --- |
| ३) | बील डिस्काऊंटींग | रु.१.००लाख | ---- |
| | एकूण कर्ज | रु.९.००लाख | रु.५.००लाख |

| | | |
|---|---|---|
| D-१ चे मुद्दल | | रु.५.००लाख |
| अधिक | | |
| D-१ चे येणे व्याज | रु.१.००लाख | |
| D-१ चे एकूण येणे | रु.६.००लाख (अ) | |
| | | |
| अधिक | | |
| अ.जाहिरात खर्च | | रु.०.१०लाख |
| ब. विमा खर्च | | रु.०.०५लाख |
| क.न्यायालयीन बाबीसाठी केलेला प्रत्यक्ष खर्च | | रु.०.३५लाख |
| एकूण येणे | रु.६.५०लाख (ब) | |
| | | |
| वजा | | |
| D-१ नंतर बँकेत भरणा केलेली रक्कम | | रु.१.५०लाख |
| | | |
| तडजोड रक्कम | | रु.५.००लाख (क) |

टीप :-

१) वर कलम (अ) मधील रकमेच्या ५% रक्कम अर्जदाराने अर्ज करतेवेळी भरणा करणे आवश्यक आहे.
२) कर्जदाराच्या मृत्यूची तारीख ही दिनांक ३१ मार्च २०२६ किंवा त्यापूर्वीची असावी.

MANJUSHA MANDAR SALVI

Digitally signed by MANJUSHA MANDAR SALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=5F3FD7897FEA9717DD9115F782C19536AFEE03D1736A0283493A8863FADEBB45, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2A02139FD3AC94FCBACD18386C5C6655556F2E876E9782822225D5F1AA558DEC, cn=MANJUSHA MANDAR SALVI
Date: 2026.06.29 14:58:34 +05'30'

**(मंजुषा साळवी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**